65/c

क्र.उसं/रसायन/सक्षम अधिकारी कार्यभार/
संकिर्ण/२००६/बी-३९०२५
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- 9 OCT 2006

प्रति,

१) उद्योग सह संचालक, मु.प्रा.वि., मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

२) अधिक्षकीय उद्योग अधिकारी,
उप विभाग, नांदेड

उद्योग संचालनालय (मु.प्रा.वि.)
10 OCT 2006
१११०.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील वंगण तेले, त्यांचे उत्पादन व वंगणतेलावरील प्रक्रिया करणा-या घटकांचे अनुज्ञप्तीसाठी " सक्षम अधिकारी " म्हणून प्राधिकृत करण्या बाबत.

संदर्भ :- १) केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे आदेश दिनांक २०.०३.१९८७

२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचा शासन निर्णय क्र.एमएससी-१०८७ (५२९३) उद्योग-१८,दि.०३.०९.१९८७

३) राज्य शासन शुध्दीपत्रक उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.एमएससी-२००४/५२५५२/(८१६१)/उद्योग-१८, दिनांक ०२.११.२००४

४) मुख्यालयाचे आदेश क्र.उसं/रसायन/सक्षम अधिकारी/कार्यभार/संकिर्ण/२००६/बी-६८४२,दि.२०.९.२००६

केंद्र शासनाच्या संदर्भिय क्र.१ वरील आदेशाच्या अनुषंगाने राज्य शासनाने संदर्भ क्र.३ च्या शुध्दीपत्रकानुसार विकास आयुक्त (उद्योग) यांनी सर्व विभागीय उद्योग सह संचालक व अधिक्षकीय उद्योग अधिकारी, नांदेड यांना वंगणतेले व ग्रीस यांचे उत्पादन व त्यावरील प्रक्रिया तसेच नुतनीकरण यासाठी मंजूरी देण्या करीता " सक्षम अधिकारी " म्हणून संदर्भ ४ च्या आदेशान्वये प्राधिकृत केले आहे.

By 10/10/06. Shri ठाकरे. I.O.

(क्रमशः)

रंगण तेले व ग्रीस (नियंत्रण) आदेश १९८७ अंतर्गत उत्पादकांच्या अनुज्ञप्ती बाबत मुख्यालयातील रसायन शाखेच्या अभिलेखावरील नस्ती आपल्या कार्यालयाकडे पुढिल कार्यवाहीसाठी सुपूर्द करावयाच्या असल्यामुळे कृपया सदरील अभिलेख त्वरीत घेउन जाण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास सुचना देण्यात याव्यात. अभिलेख घेउन जाण्या अगोदर या कार्यालयास २२८८००८७ या क्रमांकावर दूरध्वनीद्वारे सी.एस.पी.पाटोल, शाखा प्रमुख (रसायन शाखा) यांना पूर्वसूचना देण्यात याव्यात व येताना २ फ्लॉपी बरोबर घेउन येण्या बाबत कळवावे.

तसेच सदर प्रकरणी कार्यवाहीच्या नस्ती अभिलेखावर असल्यामुळे त्याचा निपटारा वेळेत होण्याच्या दृष्टीने आपणाकडून त्वरीत कार्यवाही अपेक्षीत आहे.

उद्योग उप संचालक (रसायन)